# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३

### (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते १०)**

**(१) श्री. जयंत पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयातील परि क्र.२ मध्ये नमूद “पदोन्नतीसाठीची (कक्ष अधिकारी) विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याकरीता कर्मचाऱ्याने त्या पदावर (सहायक कक्ष अधिकारी) किमान १५ वर्ष सेवा पुर्ण करणे अनिवार्य राहील” ही महत्वाची अट दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ च्या शुध्दीपत्रकान्वये वगळून त्याऐवजी पदोन्नतीसाठीची (कक्ष अधिकारी) विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याकरीता कर्मचाऱ्याने शासन सेवेत १५ वर्ष सेवा पुर्ण करणे ही अट समाविष्ट करणे, यामुळे, कक्ष अधिकारी पदावर काम करण्याकरीता सहायक कक्ष अधिकारी या पदावरील किमान / अनिवार्य सेवा करण्याची तरतूद नष्ट होणे, त्यामुळे कक्ष अधिकारी यासारख्या मंत्रालयातील अत्यंत महत्वाच्या पदावर काम करण्याकरीता कार्यक्षम तसेच सदर पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांना न्याय देण्याकरीता पुरेसे सक्षम आणि पात्र उमेदवाराची पडताळणी करणे हा पदोन्नतीपूर्वीच्या आवश्यक असणारी विभागीय परिक्षा व निम्न पदाची सेवाप्रवेशोत्तर परिक्षा पास न होणाऱ्या निम्नस्तरावरील शिपाई, लिपीक, सहायक कक्ष अधिकारी पदावरील कर्मचारी यांना केवळ शासन सेवेत १५ वर्षाचा अनुभव असल्यामुळे सदर पदावर पदोन्नतीच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट करणे ही बाब न्यायोचित नसणे, याउलट सरळसेवेने सहायक कक्ष अधिकारी पदावर नियुक्त होवून सदर पदावर ५ वर्ष निरंतर सेवा करून ४ वर्षांत ३ संधीत सदर पदाची सेवाप्रवेशोत्तर परिक्षा तसेच कक्ष अधिकारी पदासाठीची विभागीय परिक्षा विहीत वेळेत/संधीत उतीर्ण झाल्याशिवाय त्यांचा कक्ष अधिकारी पदोन्नतीसाठीच्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये त्यांचे नाव समाविष्ट न होणे तसेच सुट मिळालेल्या सहायक कक्ष अधिकाऱ्यांमुळे सरळसेवेतील सहायक कक्ष अधिकारी यांना पदोन्नती मिळण्यास विलंब होणे, एकुणच पुढील पदोन्नतीच्या संधी कमी होणे इ. बाबी अन्यायकारक असणे, याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ चे शुध्दीपत्रक रद्द करण्यात येवून यापुर्वीचा दिनांक १ मार्च, २०१८ चा शासन निर्णय लागू करावा याअनुषंगाने दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी शासनास सादर केलेल्या निवेदनावर शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

**(२) श्री.सुनिल राऊत, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर येथील क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाच्या इमारतीचा पुर्नविकासाचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणांकडून ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर व टागोरनगर हा म्हाडा लेआऊट असून कामगार वसाहतीत हे रुग्णालय असणे, घाटकोपर ते मुलुंड पर्यंतच्या परिसरातील किंबहुंना पुर्व द्रुतगती महामार्गालगत असलेले महापालिकेचे एकमेव रुग्णालय असणे, या रुग्णालयाचा लाभ विक्रोळी, कन्नमवार, टागोरनगर, कांजूर, भांडूप, सुर्यनगर या परिसरातील रुग्णांना तसेच पुर्व द्रुतगती महामार्गावरील अपघातग्रस्तांना या रुग्णालयात उपचाराअभावी फारच गैरसोय होत असणे, रुग्णालयाचा पुर्नविकास तातडीने व्हावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने म्हाडा व महापालिकेच्या संबंधित विभागाशी बैठका घेऊनही कोणतीच कार्यवाही न होणे, स्थानिक नागरिकांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी केलेले आंदोलन, सदर आंदोलनाची दखल घेऊन मा.मुख्यमंत्री महोद्यांनी म्हाडा प्राधिकरणाकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क किंबहुना मोबदला न घेता तात्काळ "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यात येईल तसेच पुर्नविकासाचे काम तातडीने पूर्ण करण्यात येईल व पुर्नविकासादरम्यान सदरचे रुग्णालय याच परिसरातील बंद अवस्थेत असलेल्या सुश्रुषा रुग्णालयात स्थलांतरीत करण्यात येईल असे आश्वासन देऊनही अद्याप म्हाडा प्राधिकरणाकडून कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, परिणामी रुग्णालयाअभावी रुग्णाची होणारी गैरसोय आणि क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचे बंद अवस्थेत असलेल्या सुश्रुषा रुग्णालय स्थलांतर झाले नसल्याने प्रचंड गैरसोय होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली असणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून रुग्णालयाचा पुर्नविकास करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री.प्रकाश आवाडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"तालुका इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील इचलकरंजी महानगरपालिकेअंतर्गत शाळांची दुरुस्ती, मैदान विकसित करणे इ. कामे फक्त कागदोपत्री मंजूर केल्याचे दाखवून सुमारे पावणे आठ लाखांची देयके अदा केली असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, महानगरपालिकेच्या महात्मा गांधी विद्यालय शाळा क्र. १८ मध्ये शाळेच्या वर्ग खोल्यांमध्ये असलेली गळती काढण्यासाठी इमारतीच्या स्लॅबवर कोबा करण्याचे काम दिनांक २५ मे, २०२२ रोजी दिले असल्याचे तसेच, शाळा क्र. ५, २७ व ३२ या एकत्रित बांधणाऱ्या शाळांसाठी क्रीडांगण विकसित करण्याचे काम दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजी ठेकेदार श्री.शैलेंद्र पवार यांना देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, काम केल्यापासून ९० दिवसांच्या कालावधीत मक्तेदारांनी कोणतीही कामे न करता तसेच करारपत्र व कामाचा आदेश, नमुना क्र. ६४, देयक प्रमाणक इ. बनावट कागदपत्रे तयार करुन त्यावर संबंधित अधिकाऱ्यांच्या

अप्रकाशित

बनावट सह्या करून व इमारतीचे काम पूर्ण केल्याचे भासवून एकूण रुपये १८,०५,५४६/- रुपयांचा धनादेश प्राप्त केल्याची बाब निदर्शनास येणे, मुख्य लेखापालाच्या ताब्यातून धनादेश बाहेर चोरीला गेले असल्याचे आढळून येणे, मक्तेदार आणि अधिकारी यांच्या संगनमताने ही बाब घडल्याचे निदर्शनास येणे, ४ वर्षांपूर्वी १०० शुध्द पेयजल प्रकल्प महानगरपालिकेने मंजुर केले असतानाही ते काम अद्यापही पूर्ण न होणे, महानगरपालिकेला जनतेकडून कराच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून मक्तेदार व अधिकारी अशारितीने संगनमताने गैरव्यवहार करीत असल्याने स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेच्या आयुक्तांची समक्ष भेट घेवून या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी केल्यानंतर महानगरपालिकेच्या उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात येणे, सदरहू समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित असणे, या गैरव्यवहारात माजी नगरसेवक यांना मोका अंतर्गत अटक होणे, अशा मुख्य आरोपीच्या नियंत्रणाखाली मक्तेदारांकडून मागील १० वर्षांपासून इंचलकरंजी महानगरपालिकेत गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास येणे, या प्रकरणाची तातडीने चौकशी करुन चौकशी समितीचा अहवाल लवकरात लवकर सादर होण्याची व तद्अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.सुनिल प्रभू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई, मालाड (पूर्व) दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील कुरार गावामध्ये मागील सहा महिन्यापासून वारंवार लागलेल्या आगीच्या घटनेमध्ये येथील रस्ते अरुंद असल्यामुळे अग्निशमन वाहने घटनास्थळी पोहोचण्यास विलंब होत असल्याने कुरार गावांमधील नियोजित रस्ते रुंदीकरण करुन वाहतुकीसाठी खुले करणे ही तातडीची गरज असून संस्कार कॉलेजपासून जी.जी. मालकरी मार्गापर्यंत नियोजित रस्ता त्यामधील बाधीत झोपड्यांना पर्यायी घरे देऊन खुले करणे, याबाबत यापूर्वी महापालिकेकडे प्रस्ताव देऊन व पाठपुरावा करण्याचा अनेकवेळा प्रयत्न करणे, परंतु, रस्ते रुंदीकरणाच्या विकासकामाबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, या रस्त्यावरील बाधित झालेल्या ४०० घरांना कुरार गावामध्ये एस.आर.ए. प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध झालेल्या पी.ए.पी. मध्ये स्थलांतर करुन सदरहू रस्ता वाहतुकीसाठी खुला करणेबाबत अद्यापही शासनातर्फे कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, यामुळे या भागातील सातत्याने होत असलेली वाहतुक कोंडी दूर करण्यासाठी सदरहू महत्वाच्या रस्त्याचे रुंदीकरण करुन वाहतुकीस खुला करण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता तसेच याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कुरारगांव परिसरातील जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(५) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे कोलवली (ता.डहाणू) कोटीम, वाणगांव, चिंचणी गावातील शेतकरी वडिलोपार्जित शेती कसत असलेल्या जमिनी ट्रस्टच्या माध्यमातून खाली करण्याच्या नोटिसा प्रशासनाकडून देण्यात येणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात चिंतेचे वातावरण निर्माण झालेले असणे, हरजीवन चॅरिटेबल ट्रस्ट यांनी सातबारावरील कुळांची नावे कमी करण्यासाठी डहाणू तहसीलमध्ये दावा दाखल केलेला असणे, शेतकऱ्यांकडे ५३/५४ च्या उताऱ्यावर संरक्षित कुळ म्हणून दाखल असताना ट्रस्ट नावाचा आधार घेऊन खोटे दावे दाखल करणे, सदर जमिन देताना शासनाने हरजीवन चॅरिटेबल ट्रस्ट सोबत झालेल्या अटी व शर्तींचा भंग झाल्याचे समोर येणे, सदर ठिकाणची सर्व जमिन भुमाफिया सोबत संगनमत करुन विक्री करण्याचा घातलेला घाट, शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या ट्रस्टच्या माध्यमातून खोटे दावे दाखल केल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन शासनाने संबंधित ट्रस्टवर तसेच दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई वा प्रतिक्रिया."

**(६) प्रा.डॉ.अशोक उईके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"उच्च शिक्षणात प्रामुख्याने इंग्रजीचा वापर जास्त होत असणे, अनुसूचित जमातीचे विद्यार्थी उच्च शिक्षणात मागे पडत असणे, उच्च शिक्षणाच्या बदललेल्या वातावरणात त्यांना जुळवून घेणे कठीण होत असणे, जागतिकीकरणाच्या सध्याच्या वातावरणात इंग्रजीचे महत्व वाढत असणे, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी माध्यमाकडे थोड्या प्रमाणात वाढत असणे, तरीही शहरांतील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत शिक्षण घेणे त्यांच्या आर्थिक कुवतीपलीकडे असणे, यासाठी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन देणे, विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना शासनाच्या दिनांक २८ ऑगस्ट, २००९ रोजीच्या निर्णयान्वये सन २०१०-२०११ पासून सुरु करण्यात येत असणे, सदर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षण देणे, या योजनेंतर्गत नामांकित शाळांच्या निवडीची सुधारित कार्यवाही करण्याबाबत शासनाने दिनांक १८ मे, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करणे, महर्षी पब्लीक स्कूल, अमरावती येथे प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांनी भेट दिली असणे, सदर भेटी दरम्यान या शाळेच्या दोन इमारती असणे, त्यापैकी एक इमारत सोयीसुविधांनी परिपूर्ण असणे सदर शाळेमध्ये नामांकित योजनेतंर्गत ८६६ विद्यार्थी शिक्षण घेत असणे, परंतु इमारतीमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नसणे, आदिवासी विद्यार्थ्यांकरीता स्वतंत्र जुनी इमारत असणे, सदर इमारतीची रंगरंगोटी केली जात नसणे, इमारतीमध्ये सोयीसुविधा नसणे, इतर विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे शिक्षण दिले जात असणे, स्नानगृहे व स्वच्छता गृहे स्वच्छ केली जात

नसणे, अधिक्षक व इतर शिक्षक विद्यार्थ्यांना मारहाण करणे, जेवणामध्ये शिळे अन्न व नास्त्यामध्ये दूध, फळे दिले जात नसणे, शैक्षणिक साहित्य व स्टेशनरी विद्यार्थ्यांना देण्यात येत नसणे, संगणक प्रयोगशाळेत पूर्णवेळ प्रशिक्षित संगणक तज्ञ/प्रशिक्षक नसणे त्याचप्रमाणे क्रीडा प्रशिक्षक, संगीत शिक्षक व कला शिक्षकांचे दस्तऐवज नसणे, शाळेची इमारत महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये येत असूनदेखील शाळेचा सातबारा उपलब्ध करुन दिलेला नसणे, शाळेमध्ये विद्यार्थ्यांना व पालकांच्या तक्रार निवारणासाठी तक्रार निवारण व्यवस्था नसणे, विद्यार्थ्यांच्या सांगण्यावरुन संस्थाचालक पालकांना राहणे / भेटणे यासाठी मनाई करीत असणे, शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र तुकडी न करता इतर विद्यार्थ्यांसोबत शिक्षण देत असणे, महर्षी पब्लीक स्कूल, अमरावती येथे अनागोंदी कारभाराबाबत प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा तसेच अपर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती यांना दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असणे, सदर नोटीसीविरुध्द शाळेने मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्याकडे याचिका दाखल करणे, सदर याचिकेला अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती तसेच प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांनी सदर शाळेविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई केल्याने शाळेसाठी स्थगिती मिळणे, दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ ते माहे जुलै, २०२३ पर्यंत मा. उच्च न्यायालयाच्या पुढे शासनाची प्रभावीपणे भूमिका न मांडणे, त्यामुळे त्यांच्याकडून महर्षी पब्लीक स्कूल, अमरावती शाळेत होत असलेली अप्रत्यक्ष मदत, यामुळे इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंत १२५ आदिवासी विद्यार्थ्यांना शाळा बदलून देण्याबाबत सन २०२२ पासून पालक मागणी करणे, परंतु अद्यापपर्यंत शाळा बदलून न मिळाणे, याबाबत पालक व विद्यार्थी यांनी दिनांक १३ जुलै, २०२३ पासून पांढरकवडा प्रकल्प कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करणे, सदरहू घटनेबाबत विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये पसरलेला असंतोष, विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या हिताच्यादृष्टीने योग्य निर्णय घेऊन त्यांना शाळा बदलून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. राजेश पाडवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल असून स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटिशांविरुद्ध लढा देत बलिदान दिल्याचा नंदुरबार जिल्ह्याचा क्रांतिकारी इतिहास असणे, मुख्य नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यात गुलाम महाराज व रामदास महाराज यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा देत ब्रिटिशांचा विरुद्ध अनेक लढायांचे नेतृत्व करणाऱ्या आदिवासी क्रांतिकाराकांचा जाज्वल्य इतिहास उपलब्ध असणे, तळोदा तालुक्यातील रावळापाणी येथे सन १९४३ मध्ये आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांवर ब्रिटिश राजवटीने बेछुट गोळीबार करत महाभयंकर "रावळापाणी हत्याकांड" घडवलेले असणे, जालियनवाला बाग हत्याकांडाप्रमाणे ब्रिटिश सैन्याने रावळापाणी गावावर हल्ला केलेला असणे, त्यामध्ये शेकडो निष्पाप आदिवासी मारले गेलेले असणे, हे हत्याकांड ब्रिटिशांच्या दडपशाहीचे क्रूर कृत्य असणे, या घटनेचा आजही

अस्वीकृत प्रत

सरकारी संकेतस्थळावर पुरावा प्रसिद्ध असणे, गुलाम महाराज, रामदास महाराज व रावळापाणी हत्याकांड स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील महत्वाचे भाग असणे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींना त्यांचा अभिमान असणे, नंदुरबार जिल्ह्याला आदिवासी वीरांचा स्वातंत्र्याच्या लढ्यातील धैर्याचा व त्यागाचा इतिहास प्राप्त असणे, मात्र रावळापाणी आदिवासी गावात आजही मूलभूत सुविधांचा अभाव असणे, आदिवासी पर्यटनाचा एक भाग म्हणून गुलाम महाराजांच्या स्मारकाला चालना दिल्यास परिसरातील आजूबाजूचा मोठा भाग विकसित होणार असणे, यासंदर्भात गुलाम महाराज यांच्या "आप की जय" परिवारातील सदस्यांची अनेक वर्षापासूनची मागणी असणे, गुलाब महाराज, रामदास महाराज व रावळापाणी हत्याकांडाचा समावेश आदिवासी वीरांच्या यादीत तसेच अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) श्री.चंद्रकांत निंबा पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"बोदवड तालुक्यातील (जि. जळगांव) गावांना पाणी पुरवठा करणारी ५१ गावे पाणीपुरवठा योजना ही सन १९९५ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत प्रादेशिक पाणीपुरवठा योजना नावाने कार्यान्वित असणे, त्यावेळी या योजनेत प्रती माणसी ५५ ते ७० लि. पाणी देण्याची तरतूद करण्यात येणे, यानंतर दिनांक १ जानेवारी, २०१८ ला सदरील योजना पुर्नजिवित होऊन कार्यारंभ आदेश देण्यात येणे, परंतु या योजनेत भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा कुठलाही सारासार विचार न करता उलटपक्षी प्रती माणसी देण्याचे प्रमाण कमी करुन प्रति माणसी ४० लि. पाणी देण्याची तरतूद करण्यात येणे, तसेच पाणी पुरवठा यांत्रिकी विभागात देखील अनेक त्रुटी आणि अडचणी ठेवूनही ही योजना तयार करतांना दिसून येणे, केवळ कागदावर निर्माण झालेली ही अपूर्ण योजना आज रोजी बोदवड वासियांची तहान भागविण्यास अपयशी ठरलेली असणे, ही योजना नव्याने करणे अपेक्षित असतांना सदरील योजना पुर्नजिवित करुन योजनेची तत्कालिन जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पाणी घेऊन जाणारी पाईप लाईनची क्षमतादेखील कमी करुन भविष्यातील लोकसंख्येचा विचार न करता आणि इतर असंख्य त्रुटी व अडचणी याचा सारासार विचार संबंधित विभागाने तोडक्या स्वरुपाची योजना तयार करुन कंत्राटदारांच्या घशात घालण्याच्या हेतूने त्रुटी कायम ठेवून योजना पुर्नजिवित करणे, ही योजना पुर्नजिवित करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करुन ५ वर्षे उलटूनही जि.प. ग्रामीण पुरवठा विभागाकडे हस्तांतरीत करण्यात न येणे, तसेच आजतागायत ही योजना सक्षमरित्या कार्यान्वित नसल्याने आज रोजी बोदवड तालुका हा तहानलेला असल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता सदरील योजनेसंदर्भात तातडीने नव्याने योजना करुन बोदवड तालुकावासियांना शुध्द व मुबलक पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) सर्वश्री बबनराव शिंदे, संजयमामा शिंदे, बाबासाहेब पाटील, दिपक चव्हाण, अनिल बाबर, समाधान अवताडे, श्रीमती सरोज आहिरे, श्री. सुभाष देशमुख, श्रीमती सुमन पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"यावर्षी राज्यात द्राक्षाचे पीक मोठया प्रमाणात आलेले असणे, परंतु द्राक्षाला मागणी नसल्यामुळे शेतकऱ्यांना द्राक्षाची विक्री कवडीमोल दराने करावी लागत असणे, त्यात शेतकऱ्यांचे झालेले करोडो रुपयाचे नुकसान, राज्यातील काही शेतकऱ्यांनी द्राक्षाला भाव मिळत नसल्यामुळे द्राक्षापासून बेदाणा निर्मिती केलेली असणे, परंतु बेदाण्याला सुध्दा मागणी नसल्यामुळे हजारो टन बेदाणा शितगृहात पडून असून शेतकऱ्यावर ओढवलेले दुहेरी संकट, सध्या सोलापूर व सांगली जिल्हयातील शितगृहे बेदाण्याने भरुन गेलेली असणे, बेदाणा कवडीमोल दराने शेतकऱ्यांना विकावा लागत असणे, यातून मार्ग व शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी बेदाण्याचा राज्यातील शालेय पोषण आहारात समावेश केल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची निर्माण झालेली शक्यता, सध्या बेदाण्याला मागणीच नसल्यामुळे शेतकऱ्यांनी शितगृहात बेदाणा ठेवून घेतलेल्या कर्जावरील व्याज शासनाने अनुदान स्वरुपात दयावे अशी मागणी काही संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन केलेली असणे, शेतकऱ्यांकडून बेदाणा खरेदी केल्यानंतर खरेदीदारांना ५ टक्के कर भरावा लागणे, त्याचा भुर्दंड सुध्दा शेतकऱ्यांवर पडत असल्यामुळे हा कर माफ करण्याची मागणी राज्यातील शेकऱ्यांनी केलेली असणे, या सर्व बाबींचा विचार करुन शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) डॉ.राहूल आहेर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील ज्या शेतकऱ्यांनी दिनांक १ फेब्रुवारी २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीमध्ये संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये, खाजगी बाजार समितीमध्ये थेट पणन अनुज्ञाप्तीधारकाकडे अथवा नाफेडकडे कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ३५० रुपये आणि जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणात अनुदान शासन निर्णय दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी निर्गमित करण्यात येणे, सदर शासन निर्णयात कांदा अनुदानासाठी अटी व शर्ती निश्चित केलेल्या असणे, कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेखाली अनुदान मिळण्यासाठी कांदा विक्री पट्टीसह, ७/१२ च्या उतारासह साध्या कागदावर ज्या बाजार आपले बँक बचत खाते क्रमांक इ. समितीकडे कांद्याची विक्री केलेली आहे तेथे अर्ज करणे, ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर ई-पीक पेऱ्यांची नोंद झालेली नाही अशा ठिकाणी कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्राची शहानिशा करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी गावपातळीवर संबंधित गावाचे तलाठी, कृषी सहाय्यक व ग्रामसेवक यांची समिती गठित करणे, सदर समितीने शेतकऱ्यांच्या कांद्याच्या लागवडीखालील क्षेत्राची पाहणी करुन, शंका असल्यास आजूबाजूच्या लोकांशी चर्चा करुन

सत्यता पडताळून, शहानिशा करावी व ७/१२ उताऱ्यावरील नोंदीसमोर स्पष्टपणे नमूद करणे, असे प्रमाणित केलेले ७/१२ उतारे कांदा अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात येणार असणे, सदर समितीने आपला अहवाल ७ दिवसांत संबंधित बाजार समितीकडे सादर केल्यानुसार सर्व संबंधित क्षेत्रिय कार्यालयांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येणे, नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये १ लाख ७७ हजार ७०६ अर्ज प्राप्त झालेले असणे, पैकी ७/१२ उताऱ्यावर ई-पीक पेरा नसल्याकारणाने एकूण २९ हजार २८८ अर्ज अपात्र ठरणे, सदरहू अटी व शर्तीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय झालेला असणे, सदरहू अपात्र शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याकरीता शासनाने सदरहू अटी व शर्तीमध्ये शिथिलता आणून त्याचा लाभ त्यांना देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ)** तारांकित प्रश्न

**(ब)** सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०२३ व मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री** : महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** :

**(क)** कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल व सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

अप्रमाणित प्रत

(३) **सांस्कृतिक कार्य मंत्री** : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत क्षेत्रामध्ये स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणाकरिता राज्य शासनाकडून मुद्रांक शुल्क आकारले जाणे, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १४७-अ अन्वये या मुद्रांक शुल्कावर एक टक्का या दराने अधिभार आकारण्यात येणे, हा अधिभार नगरपालिकांना सहाय्यक अनुदान या स्वरूपात देण्यात येणे, राज्यात एकूण २४१ नगरपरिषदा व १४४ नगरपंचायती अशा एकूण ३८५ नगरपरिषदा / नगरपंचायती असणे, नगरविकास विभागाने दिनांक २० मार्च, २०२३ (शा.नि.क्र.-मुद्रांक-०३२२/प्र.क्र.१७/नवि-३२) व दिनांक २८ मार्च, २०२३ (शा.नि.क्र.- मुद्रांक-०३२२/प्र.क्र.१७/नवि-३२) च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ ते सन २०२१-२२ या वर्षामधील थकबाकीपोटी राज्यातील २४ महानगरपालिकांना १% मुद्रांक अधिभार, रु.७९१ कोटी इतके अनुदान वितरित केलेले असणे, परंतु राज्यातील ३८५ नगरपरिषदा/ नगरपंचायती यांचे मुद्रांक शुल्क सहाय्यक अनुदान, सुमारे रु.५७७ कोटी इतके सन २०१८-१९ पासून रखडलेले असणे, यामुळे नगरपरिषदा / नगरपंचायती यांच्यासमोर निधी कमतरतेचा प्रश्न निर्माण झालेला असणे, यापैकी राज्य शासनाकडून नगरपरिषदा / नगरपंचायतींना सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील रु.७० कोटी इतके थकीत अनुदान वितरित करण्याबाबतचा शासन आदेश दिनांक ६ जून, २०२३ रोजी (आदेश क्र.नपप्रसं/२०२३-२४/मुद्रांक शुल्क अनुदान/का-५/३०४०) निर्गमित केला असणे, याअनुषंगाने नगरपरिषदा / नगरपंचायतींना उर्वरित थकीत मुद्रांक शुल्क अनुदान तात्काळ देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(२) सर्वश्री.नाना पटोले, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, सुभाष धोटे, सुनिल केदार, विकास ठाकरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"श्री महाकाली को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी आणि इतर बोगस कंपन्या" अंतर्गत आयआयटी पवई, मुंबई, महाराष्ट्र येथे २००० कोटी आणि त्याहून अधिक रकमेचा एक फार मोठा घोटाळा झालेला असणे सन २०१८-२०१९ दरम्यान शासकीय भारतीय तंत्रज्ञान संस्था बॉम्बे येथील कर्मचारी श्री रितेश पांचाळ हे सेवारत केंद्र सरकारचे IITB कर्मचारी, श्री महाकाली IITB पवई घोटाळ्याचे संचालक, प्रवर्तक, एजंट, सबएजेंट असणे, या कंपन्यांमध्ये संपूर्ण महाराष्ट्र आणि आसपासच्या राज्यांमधील अंदाजे १५००० हून अधिक गुंतवणूकदारांनी खूप मोठी गुंतवणूक केलेली असणे, सदर कंपनी सन २०१८-२०१९ दरम्यान सुरू होऊन आणि २००० कोटींहून अधिक व्यवसाय केल्यानंतर श्री रितेश पांचाळच्या अटकेनंतर दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी बंद झालेली असणे, या केंद्र सरकारच्या आयआयटीबी कर्मचाऱ्यांनी १५०००-२५००० रुपयांची लूट केली असणे, या गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी कोणतेही सरकारी अधिकारी मदत करत नसल्यामुळे या गुंतवणूकदारांना खूप कठीण वेळ आलेली असणे, परिणामी गुंतवणूकदारांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन सदर गुंतवणूक कंपनीतील संचालक, प्रवर्तक, एजंट, सबएजेंट यांचेवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याबाबत याप्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री.नितेश राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गेल्या काही महिन्यांपासून राज्यात औरंगजेबाची प्रशंसा करणारे मेसेज, व्हॉट्सॲप स्टेटसवरून करण्यात आल्यामुळे राज्यात हिंसाचार व दंगलीचे वातावरण निर्माण झाले असणे, औरंगजेबामुळे गेल्या महिनाभरात राज्यात विशेषत: कोल्हापूर, अहमदनगर, धुळे, सांगली, सोलापूर, बीड, नवी मुंबई, अकोला, जळगाव आणि नाशिकमध्ये हिंसाचाराच्या घटना घडल्या असणे, सोशल मीडियावरील पोस्ट किंवा स्टेटसमुळे महाराष्ट्रात बंद किंवा हिंसाचार होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, राज्यात जातीय तणाव निर्माण करुन शासनाला अस्थिर करण्याचा प्रयत्न सुरु असणे, राज्यात 'लव्ह जिहाद', 'लँड जिहाद' धर्मांतरण, गोहत्या विरोधात ५० हून अधिक सकल हिंदू समाजाकडून मोठ्या स्वरूपाचे मोर्चे संपूर्ण राज्यात जोरात सुरू असणे, परिणामी हिंदू जन आक्रोश मोर्चाने काढलेल्या मोर्चांच्या निमित्ताने अशा घटना समोर येत असणे, पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकांपूर्वी मतदारांचे ध्रुवीकरण करण्यासाठी जातीय तेढ पेरली जात असल्याचे सरकारचे म्हणणे असणे,

अग्रिम प्रत

शांतता, सामुदायिक संबंधांसाठी ओळखल्या जाणाऱ्या राज्यात जातीय घटना घडवून कोणीतरी जाणीवपूर्वक समुदायांना भडकावून शांतता भंग करण्याचा प्रयत्न करत असणे, औरंगाबाद जिल्ह्याचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर करण्यात आल्यामुळे तसेच अहमदनगर चे अहिल्यानगर झाल्यामुळे राज्यात हिंसाचाराच्या घटना होत असल्याचे निदर्शनास येणे, दिनांक १२ जून, २०२३ रोजी टिपू सुलतानवरील सोशल मीडिया पोस्टच्या निषेधार्थ कोल्हापुरातील कागल शहरात बंद पुकारण्यात येऊन अहमदनगरच्या पारनेर तालुक्यात एका २२ वर्षीय मुलाने सोशल मीडियावर केलेल्या पोस्टच्या निषेधार्थ बंद पाळण्यात आला असणे, तसेच विजापूरचा जनरल अफजलखानचा फोटो डीपीवर लावल्याप्रकरणी सांगलीतील एका अल्पवयीन तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला असणे, बीड येथील आष्टी येथे बाप तो बाप रहेगा" अशा आशयाचे वाक्य टाकून व्हाट्सॲपला स्टेटस ठेवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला असणे, बहुतांश ठिकाणी पोलिसांनी गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ केलेली असणे, पोलीसांनी वेळेत गुन्हे दाखल न केल्यामुळे स्थानिक गावांकऱ्यांकडून गावबंद केले गेलेले असणे, दिनांक ५ जून रोजी अहमदनगर येथे एका मिरवणूकीत नाचतांना औरंगजेबाचे पोस्टर झळकावले गेलेले असणे, तसेच संपूर्ण राज्यासह अहमदनगर, कोल्हापूर ह्या ठिकाणी शहरात शांतता रहावी म्हणून पोलिसांनी काही जणांवर खोटे गुन्हे दाखल करणे, अहमदनगर येथील रामवाडीमध्ये घडलेल्या दंगलीत जी मुलं शहरातच नव्हती त्यांचे पुरावे दिल्यानंतर देखील जाणीवपूर्वक गुन्ह्यात नाव टाकणे, दंगल घडविणाऱ्या विशिष्ट समाजातील लोकांना पोलीस स्टेशनपासून ते जेल पर्यंत व्हीआयपी सुविधा पुरविली जात असणे,तसेच राज्यात काही ठिकाणी दंगली घडविण्याबाबत पूर्वनियोजित तयारी होत असणे, मात्र पोलिसांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे आढळणे, त्यामुळे राज्यात जातीय तेढ निर्माण करुन हिंसाचाराचे व दंगलीचे वातावरण निर्माण करणाऱ्या दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, हिंदुत्ववादी संघटनांनी निवेदनाच्या माध्यमातून शासनास करणे, या सर्व घडलेल्या घटनांमुळे महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, त्यामुळे राज्यात जातीय तेढ निर्माण करुन हिंसाचाराचे व दंगलीचे वातावरण निर्माण करणाऱ्या दोषींवर जिल्हा हद्दपार किंवा मोक्का अंतर्गत तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**(४) श्री.हरीभाऊ बागडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील फुलंब्री गाव व आसपासच्या गावातील हिंदू मुलींवर पाळत ठेवून काही समाजकंटक व्यक्ती हे शाळा, कॉलेज मध्ये जात-येत असणाऱ्या मुलींशी संपर्क करून फोनवर संभाषण सुरू करीत असल्याचे माहे जुलै, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आढळून येणे, संभाषण करून, व्हिडीओकॉल

अप्रकाशित प्रत

करून, मुलींचे व्हिडीओ व फोटो डाऊनलोड करून ठेवत असल्याचेही निदर्शनास येणे, या मुलींना लग्नाची मागणी करण्यात येणे, जर मुली तयार झाल्या नाहीत तर व्हिडीओमध्ये सेव्ह केलेले संभाषण व फोटो वरून या मुलींना ब्लॅकमेल केले जाणे, तसेच समाजामध्ये या मुलींची बदनामी करीत असणे, त्यानंतर जबरदस्ती करून पळून जाण्यास व जबरदस्तीने धर्मांतरण करण्यासही भाग पाडत असणे, त्यामुळे फुलंब्री गाव व आसपासच्या पालकांमध्ये व नागरिकांमध्ये पसरलेले दहशतीचे वातावरण, या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून अशा समाजकंटक व्यक्तींविरुद्ध तात्काळ गुन्हे दाखल करून कारवाई करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(५) श्री.विनोद अग्रवाल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गोंदिया जिल्हयातील डांगुर्ली गावाजवळ सन २००८ मध्ये वैनगंगा नदीवर शेती सिंचनाकरीता तेढवा-शिवणी उपसा सिंचन योजनेला सुरवात करण्यात येणे, सन २०२३-२४ पर्यंत २०० कोटींपेक्षा जास्तचा निधी खर्च करुन सुध्दा नदीपात्रामध्ये पाणी उपलब्ध नसल्याने शेतकरी बांधवांना सिंचनाकरीता पाणी मिळत नसणे, तसेच याच ठिकाणी गोंदिया शहराला पाणी पुरवठा करण्याची सुध्दा योजना असणे, सन २०२० मध्ये नदीपात्रामध्ये बंधाऱ्या अभावी पाणी उपलब्ध नसतांनाही नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजनेच्या बांधकामाला सुरुवात करण्यात येणे, उक्त दोन्ही योजनांवर कोट्यवधींचा खर्च करण्यात आलेला असणे, नदीपात्रामध्ये बंधाऱ्याअभावी पाणी उपलब्ध नसल्याने सुरु करण्यात आलेल्या नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजनेप्रती तथा आधिच्या तेढवा-शिवणी उपसा सिंचन योजनेप्रती नागरिकांमध्ये असंतोष असून आधी डांगुर्ली उच्च पातळी बंधाऱ्याचे बांधकाम करण्याची मोठया प्रमाणात मागणी करणे, डांगुर्ली उच्च पातळी बंधारा बांधकामाचा महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण तथा राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती यांचे मान्यतेसह सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाला प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात येणे, डांगुर्ली उच्च पातळी बंधाऱ्याचे बांधकामाशिवाय तेढवा-शिवणी तथा नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजना शेतकऱ्यांना सिंचनाकरीता तथा गोंदिया शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात पाणी पुरवठा करणे शक्य होणार नसणे, त्याचप्रमाणे रजेगाव येथे वाघ नदीवर सन १९९९ मध्ये सुरु करण्यात आलेल्या रजेगाव-काटी उपसा सिंचन योजनेवर सन २०२३-२४ पर्यंत १०० कोटींपेक्षा जास्तचा निधी खर्च करण्यात येणे, परंतु उपसा सिंचन योजनेचे झालेले अर्धवट बांधकाम तथा नदीपात्रामध्ये बंधाऱ्या अभावी पाणी उपलब्ध राहत नसल्याने उपसा सिंचन योजनेचा कोणताही लाभ होत नसणे, रजेगाव-काटी उपसा सिंचन योजनेच्या ठिकाणी २ ते ३ मीटर उंचीच्या बंधाऱ्याचे बांधकाम केल्यास सदर योजनेचा सुध्दा शेतकऱ्यांना सिंचनाकरीता लाभ होणे शक्य होणे, परंतु डांगुर्ली येथील तेढवा- शिवणी, नवेगाव-देवरी उपसा सिंचन

अग्रिम प्रत

योजना तथा रजेगाव येथील रजेगाव-काटी उपसा सिंचन योजनांना मंजुरी प्रदान करतांना तज्ञांनी मोक्का पाहणी तथा क्षेत्राचा अभ्यास केलेला नसल्याचे निदर्शनास येणे, त्याचप्रमाणे पिंडकेपार गावाजवळील पिंडकेपार लघु प्रकल्पास आवश्यक २५५.६४५ हे.आर. पैकी १००.९०५ खाजगी जमिन संपादीत करण्यात आलेली असून १५४.७४ हे.आर. जमिन संपादीत करण्यात आलेली नसल्याने सदर प्रकल्प पूर्णत्वास आलेला नसणे, सदर प्रकल्पामुळे ११७० हे.आर. क्षेत्रामध्ये सिंचन तथा गोंदिया पेरी अर्बन टप्पा क्र.२, पाणी पुरवठा होण्यावाचून वंचीत झाले असणे, डांगुर्ली उच्च पातळी बंधाऱ्याचे बांधकामाअभावी शासनाने कोट्यवधीचा खर्च करुन सुध्दा डांगुर्ली येथील तेढवा-शिवणी, नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजना व २ ते ३ मीटर उंचीच्या बंधाऱ्या अभावी रजेगाव येथील रजेगाव-काटी उपसा सिंचन योजनेचा तथा पिंडकेपार लघु प्रकल्पाचा सिंचनाकरीता व नागरिकांना पाणी पुरवठ्याकरीता कोणत्याही प्रकारे लाभ होत नसल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असणे, त्यामुळे डांगुर्ली उच्च पातळी बंधाऱ्याचे प्रस्तावाला तातडीने प्रशासकीय मान्यता प्रदान करुन बांधकाम करण्याची नागरिकांनी केलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. अमित साटम, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई शहर व मुंबई उपनगरातील शासन प्रदान जमिनींवर सुमारे ३,००० गृहनिर्माण संस्था आणि महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील शासन प्रदान जमिनींवर सुमारे २२,००० गृहनिर्माण संस्था असणे, सदर गृहनिर्माण संस्थांच्या ५०/६० वर्षे जुन्या/जीर्ण इमारतींमध्ये राहणाऱ्या मुंबईमधील सुमारे १२,५०,००० मध्यमवर्गीय नागरिकांना दिलासा मिळून त्यांच्या जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाचा/स्वयं पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लागेल, तसेच महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील सुमारे ५६ लाख नागरिकांना दिलासा मिळेल, याबाबत दिनांक २ मार्च, २०१९ रोजी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय काढून नागपुर व अमरावती जिल्ह्यातील नाझुल निवासी जमिनी ५% अधिमुल्याने कायमस्वरुपी कालावधीसाठी फ्रीहोल्ड केल्या असणे,विशेष म्हणजे 'नाझुल कमर्शियल जमिनी' फक्त १०% अधिमुल्याने फ्रीहोल्ड करण्याची मुभा शासनाने तिथल्या नागरिकांना दिली असणे, परंतु मुंबई व महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांसाठी शासनाने मात्र वेगळा न्याय केला असणे, "कब्जेहक्क वर्ग २ जमिनी १५% व भाडेपट्टीच्या जमिनी २५%" एवढ्या अधिमुल्याने फ्रीहोल्ड करण्याची अधिसूचना जारी करुन व त्याची मुदत फक्त दिनांक ७ मार्च, २०२४ पर्यंत केली असणे, दिनांक ८ मार्च, २०२४ नंतर हेच अधिमूल्य अनुक्रमे ६०% व ७५% एवढे आकारले जाणार असल्यामुळे याप्रकरणी नागरिकांकडून तक्रारी वाढू लागल्या असणे, त्यामुळे मुंबई व महाराष्ट्रातील कब्जे हक्क वर्ग -१ मध्ये कमाल ५% (पाच टक्के) अधिमुल्याने कायमस्वरूपी कालावधीसाठी फ्री होल्ड करण्याबाबत शासनाने

करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मराठवाड्यात अनेक शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनींच्या सातबाऱ्यावर इतर हक्कात कुळाच्या नोंदी असणे, सदरील इतर हक्कातील नोंदीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची खरेदी विक्री करता येत नसणे तसेच बँकेचे कर्ज मिळत नसणे, कुळाच्या नोंदी कमी करण्यासाठी हैदराबाद कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम १९५० दोन वर्षाहून अधिक कलावधीसाठी ताबा नसलेल्या कुळाच्या नोंदी सातबारा वरील इतर हक्कातून तहसिलदार यांच्या स्तरावर सुनावणी होऊन तसेच स्थानिक चौकशी जवाब याद्वारे माहिती घेऊन कमी केली जात असणे, मराठवड्यातील फक्त लातूर जिल्ह्यातील कुळाच्या नोंदी कमी करण्याची प्रकरणे गेली दोन वर्षापासून विभागीय आयुक्त यांच्या तोंडी आदेशानुसार प्रलंबित असणे, विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी फक्त लातूर जिल्ह्यातील प्रकरणांच्या अनुषंगाने सदरील नोंदी कमी करण्यासाठी दिनांक २० डिसेंबर, २०२१ च्या पत्रान्व्ये अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अभिप्राय मागवला असणे, सदरील अभिप्राय प्राप्त होईपर्यंत प्रकरणे निकाली न काढण्याबाबत जिल्हाधिकारी लातूर यांनी सर्व तहसिलदार यांना सूचना दिलेल्या असणे, सदरील अभिप्राय अद्याप प्राप्त न झाल्याने मराठवड्यातील फक्त लातूर जिल्हयातीलच सदरील प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येणे, इतर जिल्ह्यात पूर्वीप्रमाणे प्रकरणे निकाली निघत असणे, त्यामुळे लातूर जिल्ह्यातील कुळाच्या नोंदी असलेल्या शेतकऱ्यांत तीव्र नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, कुळधारक मयत असेल, दोन वर्षापेक्षा अधिक कलावधीसाठी ताबा नसेल, अशा स्थितीत सदरील शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील इतर हक्कातील कुळाच्या नोंदी पूर्वीप्रमाणे कमी करण्याचे अधिकार मंडल अधिकारी स्तरावर देण्याबाबत आणि लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(८) **श्री. यशवंत माने, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मौजे चिंचोलीकाटी, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील एम.आय.डी.सी. प्लॉट नं. १०४ मध्ये असलेल्या बालाजी अमाईस कंपनीने कंपनीचे बांधकाम करीत असतांना जागा सपाटीकरण करण्यासाठी मुरूम भराई करून जागा लेवल केलेली असणे, त्यासाठी लागणारा मुरूम व दगड हा अवैधरीत्या गोरगरीब जनतेच्या शेतामधून उत्खनन करून भरलेला असल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्यासंदर्भात सन २०२३-२४ या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये माहे मार्च, २०२३ मध्ये लक्षवेधी सूचना लावून कारवाईची मागणी केली असता संबंधित कंपनीला शासनाने ( महसूल

विभागाने ) रुपये ४३ कोटी ४६ लाख ( अक्षरी - त्रेचाळीस कोटी सेहचाळीस लाख ) इतक्या रकमेच्या नोटीस बजावण्यात येऊन तत्कालीन मा. महसूल मंत्र्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे सभागृहामध्ये आश्वासन दिलेले असणे, तथापि शासनाने ( महसूल विभागाने ) या प्रकरणाची चौकशी केली आहे का ? चौकशी केली असेल तर कोणत्या अधिकाऱ्यावर काय कारवाई केली असा प्रश्न निर्माण होणे, तसेच तेथील बालाजी अमाईस कंपनीकडून किती दंड वसूल करण्यात आला, दंड वसूल केला नसेल तर का नाही केला, याबाबत अद्यापही संदिग्धता असणे, परिणामी गोरगरीब शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व शासनाप्रती संतापाची भावना, याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता वा शासनाची भूमिका."

**(९) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर तालुक्यात ताडाळी येथील एम.आय.डी.सी. परिसरात धारिवाल पावरप्लँट अस्तित्वात असणे, सदर पावरप्लँट मध्ये जुन्या मशनरींचा वापर होत असणे, सदर प्लँटमुळे सभोवतालच्या परिसरात प्रदूषण होत असल्याचे माहे जुलै, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, या प्लँटद्वारे वर्धा नदीच्या पात्रातून पाणी चोरी केली जात असणे, या प्लँटमुळे तयार होणारी राख शेतकऱ्यांच्या शेतात पसरली जात असणे, यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असणे, कंपनीद्वारे शेतकऱ्यांना कुठलीही मदत मिळत नसणे, या कंपनीमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन वारंवार अपघात होत असणे, या कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. सुनिल भुसारा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विक्रमगड मतदारसंघातील टेंभा खर्डी, जव्हार, जामसर, बोपनदी, रुईघर रस्त्यांची मंजूरी देण्यात येणे, स्विकृत निविदा व मूळ निविदा यामधील फरक रु.६१.५० कोटी होणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा स्विकारुन मे.जिजाऊ कन्स्ट्रक्शन, ठाणे यांना देण्यात येणे, सदर रस्त्यांची प्रशासकीय मान्यता रक्कमेपैकी माहे जुलै, २०२१ अखेरपर्यंत केवळ १४.२३ कोटी रुपये म्हणजेच प्रशासकीय मान्यतेपेक्षा वाढीव खर्च न होणे, असे असतांनाही ठेकेदाराला दिनांक ३० मार्च, २०२२ पर्यंत वाढीव रकमेचे देयक अदा करण्यात येणे, मुळ निविदेपेक्षा जादा रक्कम प्रशासनाकडून देण्यात येणे, शासकीय तिजोरीचा अपव्यय होत असल्याचे प्रथमदर्शनी

निदर्शनास येऊन याप्रकरणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची शक्यता, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरच्या कामाची सुधारित प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची केलेली मागणी, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **सर्वश्री. अमीन पटेल, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात उमरखाडी परिसरात पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या इमारती असणे, या इमारती जुन्या व जीर्ण झालेल्या असून त्यांचा पुनर्विकास प्रस्तावित असणे, परंतु वास्तूविशारदाच्या दिरंगाईमुळे येथील पुनर्विकास प्रक्रियेस विलंब होणे, त्याचप्रमाणे पंतप्रधान अनुदान प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या इमारतींची अवस्था विशेषतः नागपाडा, बीआयटी, मुंबई सेंट्रल विभागातील इमारतींची अवस्था बिकट असणे, या इमारतींच्या पुनर्विकासाला शासनाकडून मंजुरी मिळणे, परंतु आजमितीपर्यंत त्याचे अध्यादेश न निघणे, मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात कामाठीपुरा परिसर येणे, श्रीमंत थाटाचा वारसा व ऐतिहासिक दर्जा असलेला असा हा मुंबईतील एक विभाग असणे, सन १७९५ च्या पुढे कामाठी नागरीक या ठिकाणी वास्तव्यास येणे, त्यामुळे हा परिसर कामाठीपुरा या नावाने ओळखला जाऊ लागणे, या परिसरात मध्यमवर्गीय बहुभाषिक लोकांची वस्ती असणे, या विभागात अनेक जुन्या व जीर्ण चाळी असणे, या विभागातील इमारतींची अवस्था दुरुस्ती न होण्यासारखी असणे, त्यामुळे या विभागातील इमारतींचा लवकरात लवकर पुनर्विकास करण्याची होत असलेली स्थानिकांची मागणी, शासन स्तरावर वेळोवेळी पाठपुरावा सुरु असणे, कामाठीपुरा क्लस्टर पुनर्विकासाअंतर्गत ८०० जागामालक आणि अंदाजे ८००० रहिवाशी जोडले गेले असणे, त्यानुषंगाने म्हाडाला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात येणे, परंतु कामाठीपुरा पुनर्विकास प्रक्रियेस गती मिळणे आवश्यक असणे, कामाठीपुरा लॅन्डलॉर्ड वेल्फेअर असोशिएशन यांनी पुनर्विकास प्रक्रियेस गती यावी यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेन्ट कन्सल्टंट यांची नियुक्ती केलेली असणे, मागील अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या पाठपुराव्याचे व व्यवहार्यतेचे सर्व दस्ताऐवज या समितीकडून शासन स्तरावर सादर करण्यात आलेले असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१२) **श्री. अनिल बाबर, ॲड. शहाजीबापू पाटील, सर्वश्री. बाळासाहेब पाटील, विक्रमसिंह सावंत, डॉ.विश्वजित कदम, श्रीमती सुमन पाटील, श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यभर सुरु झालेल्या पावसामुळे सर्वत्र अतिवृष्टी होणे, विशेषतः सांगली जिल्ह्यांतील काही विशिष्ट भागात माहे जून-जुलै, २०२३ या महिन्यात पडलेला

मुसळधार पाऊस, तर काही भागात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी, तासगांव, कडेगांव, जत, कवठेमहांकाळ व सोलापूर जिल्हयातील सांगोला, मंगळवेढा, तसेच सातारा जिल्हयातील माण, खटाव इत्यादि तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई उद्‌भवत असल्याचे निदर्शनास येणे, उक्त जिल्ह्यांत जलसंपदा विभागाच्या टेंभू/ताकारी/म्हैसाळ/विसापूर पुणदी/उरमोडी उपसा सिंचन योजना सध्यस्थितीत सुरु असणे, जिल्हयातील पाणी टंचाईवर मात करण्याकरिता पावसाळयात वाहून जाणारे पाणी उचलून ते दुष्काळी भागात पुरविण्याची नितांत आवश्यकता, काही भागात टँकर पुरविण्याची नितांत आवश्यकता असतांना याबाबत शासन उदासिन असणे, परिणामी पाणी टंचाईमुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष असून त्यांना पाण्याकरिता करावी लागत असलेली वणवण, तसेच उक्त उपसा–सिंचन योजनांना पुरविण्यात येणारी वीजेवर वीज सवलत माहे एप्रिल, २०२३ पासून बंद करण्यात आलेली असणे, सदर सवलत माहे एप्रिल, २०२३ पूर्वी रु.१.१६ प्रतियुनिट असणे तर आता ती प्रतियुनिट रु.५.२६ आकारण्यात येणे, त्यामुळे आर्थिक भार पडत असल्याने बंद पडण्याची आलेली वेळ, त्यामुळे सदर उपसा सिंचन योजनांना वीज सवलत सुरु करुन टंचाईमधून वीज बिल भरण्याबाबत करावयाची कार्यवाही, त्याचबरोबर टंचाईग्रस्त भागात चारा डेपो सुरु असून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, टंचाईग्रस्त भागात तात्काळ पाणी उपलब्ध व्हावे यादृष्टीने शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**पाच : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चेची सूचना)**

**डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. अनिल देशमुख, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, सुनिल केदार, अस्लम शेख, प्रा.वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री. विकास ठाकरे, अमीन पटेल, अमित देशमुख, धिरज देशमुख, नाना पटोले, डॉ.विश्वजित कदम, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री. मोहन मते, जयंत पाटील, चेतन तुपे, रविंद्र वायकर, अतुल भातखळकर, चंद्रकांत नवघरे, रोहित पवार, अजय चौधरी, दिलीप मोहिते-पाटील, अबू आजमी, जयकुमार रावल, श्रीमती श्वेता महाले, श्री. शिरीष चौधरी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील महिला व मुलींवरील अत्याचारात वाढ झालेली असून देशपातळीवर महाराष्ट्राचा महिला अत्याचारात तिसरा क्रमांक असल्याची चिंताजनक माहिती माहे जुलै, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, कामावर महिलांचा छळ होण्याच्या

अग्रिम प्रत

घटनांमध्ये १३९ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बलात्कार आणि अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये २१७ टक्क्यांनी वाढ झालेली असणे, बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असणे, गत वर्षात सुमारे चार हजार महिला व मुली गायब असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आलेली असणे, गायब असलेल्या महिला, मुलींना शोधण्यात आलेले नसणे, महिला, मुली व बालकांवरील अत्याचारासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास प्रशासनास आलेले अपयश, सदर प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असणे, या बेपत्ता झालेल्यांमध्ये सर्वाधिक ९८ मुली व महिलांचा समावेश दिसून येणे, त्यामुळे महिला व मुली असुरक्षित आहेत हे स्पष्ट दिसून येणे, धुळे जिल्ह्यातील एकूण १७ पोलीस ठाण्यांतर्गत दिनांक १ जानेवारी ते ५ एप्रिल, २०२३ दरम्यान एकूण २८३ जणांचा विविध कारणांमुळे आकस्मिक मृत्यू झालेला असणे, त्यापैकी २६६ जणांचे वारसदार आढळून येणे तर १७ जण बेवारस असल्याची नोंद पोलीस दप्तरी झालेली असणे, याच कालावधीत २४४ जण हरवल्याच्या तक्रारी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आलेल्या असणे, त्यापैकी २० जणांना शोधून काढण्यात पोलिसांना यश येणे, त्यात २ पुरुष १ महिला, ४ मुले आणि ८ मुलींचा समावेश असणे, एकूण ९८ महिला, ७७ मुली व ६८ पुरुष आणि ३३ मुले अद्यापही पोलीस दप्तरी बेपत्ता असल्याची नोंद झालेली असणे, तसेच माहे जानेवारी, २०२३ ते माहे मार्च, २०२३ या ३ महिन्यांच्या कालवधीत राज्यातील ५,६१० तरुणी व महिला बेपत्ता असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, बेपत्ता झालेल्या महिलांमध्ये १६ ते २५ या वयोगटातील ३ हजार ५९४ तरुणींचा समावेश असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये सर्वाधिक २,२०० मुली व महिला बेपत्ता झाल्यापासून बेपत्ता होण्याचे प्रमाण दिवसाला सरासरी ७० असे असणे, बेपत्ता झालेल्या मुली व महिला यांचे प्रमाण पुणे येथे अधिक असून पुण्यातून २,८५८ मुली व महिला बेपत्ता झालेल्या असणे, अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथे राहणाऱ्या व पुण्यात अभ्यास करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत चांगले यश मिळवून अधिकारी झालेल्या दर्शना पवार यांचा मृतदेह दिनांक १८ जून, २०२३ रोजी वेल्हे पोलिस स्टेशनच्या हद्दीत आढळून येणे, पोलिसांनी याबाबत चौकशी करुन आरोपी श्री.राहुल हंडोरे याला दिनांक २२ जून, २०२३ रोजी अटक करणे, श्रीमती पवार ह्या ८ दिवसांपासून बेपत्ता झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करणे, त्यानंतर त्यांचा मृतदेह पोलिसांना पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील राजगडाच्या पायथ्याजवळ कुजलेल्या अवस्थेत सापडणे, आरोपीने हत्या केल्याची कबुली पोलिसांकडे देणे, ही घटना ताजी असतानाच दिनांक २७ जून, २०२३ रोजी सकाळी १० वाजता पुण्यात एका तरुणीवर कोयत्याने हल्ला करुन एकतर्फी प्रेमातून तिची हत्या करण्याच्या उद्देशाने कोयता घेऊन एका तरुणाने तिच्या मागे धावून तिची हत्या करण्याचा प्रयत्न करणे व थोडक्यात तिची हत्या करण्यात अपयशी ठरल्याची घटना उघडकीस येणे, या हल्ल्यात तरुणी जखमी होणे, मात्र दोन तरुणांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून या तरुणीची जीवघेण्या हल्ल्यातून सुटका करणे, महिला-मुलींवरील अत्याचार आणि बाललैंगिक गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ, तसेच महिला बेपत्ता होण्याचे व एकतर्फी प्रेमातून महिलांवर हल्ले होण्याच्या वाढलेल्या घटनांमुळे राज्यातील जनतेत पसरलेले भितीचे वातावरण, राज्यातील

महिलांना सुरक्षित ठेवण्यासाठी उक्त प्रकरणांचा काटेकोर तपास करून गुन्हेगारांना विनाविलंब कठोर शिक्षा होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान (एलआयटी) विद्यापीठ, नागपूर विधेयक, २०२३

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) आणि महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

**सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रविंद्र वायकर, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी,**

**विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री.संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री.रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात सातत्याने होणारा खातेबदल, कामाच्या विभागांकडे मंत्र्यांचे होत असलेले दुर्लक्ष, एकाच मंत्र्याकडे एकाहून अधिक जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी असणे, त्या माध्यमातून राज्याच्या विकासाला खीळ बसणे, राज्यात शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण लक्षणीय असणे, शासनाने विधानसभेत स्पष्ट आश्वासन देऊनही राज्यातील हजारो शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर रकमेचा लाभ न मिळणे, बोगस बी-बियाणे व खते विक्रीचे रॅकेट कार्यरत असूनही त्यावर गांभीर्याने कारवाई न होणे. राज्यातील नदी-नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण व साखळी बंधाऱ्यांची कामे घेण्याची आवश्यकता, क्षतिग्रस्त तलावांसह सध्या कार्यान्वित असलेले सिंचन प्रकल्प निधीअभावी रखडणे, "शासन आपल्या दारी" उपक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन सुविधा ऑफलाईन देऊन त्याला राजकीय स्वरुप देणे, जनतेस त्याचा काहीही फायदा न होणे व कार्यक्रमाची जाहिरात व अंमलबजावणीसाठी अब्जावधी रुपयांचा वारेमाप खर्च होणे, तत्कालीन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) यांनी शेतकऱ्यांना सहाय्यभूत अनेक शिफारशी करणे, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत नाराजीची भावना निर्माण होऊन त्यांनी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणे, मागील सरकारने मंजूर केलेल्या समृद्धी महामार्गाचाच भाग असलेल्या जालना नांदेड महामार्गचे काम कुर्मगतीने सुरु असणे, जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा योग्य मोबदला न मिळणे, नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचा प्रस्ताव अद्यापही तयार न होणे, मराठवाड्यामध्ये बूलेट ट्रेन प्रकल्प आणण्याकरिता शासन उदासीन असणे, हिंगोली सारख्या "ना उद्योग" भागातील सहकारी साखर कारखान्यांना पॅकेज स्कीम इन्सेंटिव अंतर्गत मिळणाऱ्या सवलती काढून घेणे, विमानतळांचा विकास व अद्यावतीकरणाबाबत शासन उदासीन असणे, राज्यभर विमानतळे उपलब्ध असूनही निवडक शहरे वगळता इतरत्र विमानसेवा सुरू नसणे, मनमाड औरंगाबाद परभणी रेल्वेच्या दुपदरीकरणास सुरुवातही न होणे, नाशिक-पुणे रेल्वेमार्गाचे काम खोळंबणे मराठवाडा व विदर्भात नवीन उद्योग व गुंतवणूक आणण्याबाबत शासनाच्या

अप्रकाशित प्रत

उदासीनतेमुळे बेरोजगारी व आत्महत्यांचे प्रमाण वाढणे, राज्यातील औद्योगिक प्रकल्प बाहेर जाणे, पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता घाईगडबडीने वॉटर ग्रीडची संकल्पना राबविणे, बाभळी धरणातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी तेलंगणा राज्याच्या सहमतीने सर्वोच्च न्यायालयाकडे संदर्भ न करणे, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची आवश्यकता असणे, शासकीय रुग्णालये व महाविद्यालयांची झालेली दुरवस्था वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, एसईबीसी मधून ईडब्ल्यूएसचा विकल्प दिलेल्या मराठा उमेदवारांच्या नियुक्तीचे प्रकरण उर्जा विभागाकडे मागील दोन महिन्यांपासून प्रलंबित असणे, वैधानिक विकास मंडळांच्या पुनरुज्जीवनाबाबत केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा न केल्यामुळे मागास भागात मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला अनुशेष, जातीचे प्रमाणपत्र वेळेत मिळण्यात होत असलेली अक्षम्य दिरंगाई, परिणामी जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, मराठा व इतर आरक्षणाच्या संदर्भात प्रचंड मोर्चे, उपोषणे, आत्महत्या करुनही या बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाच्या विविध योजनांना लाभ व्हावा म्हणून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सोय असणे, असे अर्ज करीत असताना संपूर्ण दिवसभर सर्व्हर डाऊन राहत असल्याने केवळ एका अर्जासाठी संपूर्ण दिवस वाया जाणे, शासनाच्या विविध विभागातील पद भरती करीता आयोजित करण्यात येत असलेल्या परिक्षांचे शुल्क अत्यंत जास्त असल्याने गरीब कुटुंबातील परिक्षार्थींना शुल्क भरण्यात अडचणी येणे, केवायसीच्या नावाखाली अतिवृष्टी व पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा सेविकांच्या पगारवाढीचा प्रश्न प्रलंबित असून काही महिन्यांपासून त्यांना पगारही न मिळणे, राज्याची ढासळलेली अर्थव्यवस्था, रोजगार देण्याची संधी असतानाही राज्यातील विविध विभागाअंतर्गत रिक्त असलेल्या २ लाख ४० हजार जागा न भरणे, ठराविक सदस्यांनाच विकास कामासाठी निधी उपलब्ध होत असल्याने समतोल विकासाच्या संकल्पनेला बसलेली खीळ, महाविकास आघाडी सरकारच्या काळातील कामांना दिलेली स्थगिती अद्यापही न उठविल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

आठ : **श्री. भरतशेट गोगावले, ॲड. आशिष शेलार, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री प्रताप सरनाईक, राम कदम, सुनिल शेळके, संजय शिरसाट, अतुल भातखळकर, यशवंत माने, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री नितेश राणे, दत्तात्रय भरणे, ज्ञानराज चौगुले, योगेश सागर, दिपक चव्हाण, सदा सरवणकर, सुनील राणे, संग्राम जगताप, डॉ. बालाजी किणीकर, ॲड. पराग अळवणी, श्री. अतुल बेनके, डॉ. संजय रायमुलकर, सर्वश्री अमित साटम, दिलीप मोहिते-पाटील, सुहास कांदे, डॉ. संजय कुटे, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री मंगेश कुडाळकर, गणेश नाईक, जयकुमार रावल, किशोर पाटील, प्रशांत बंब, राजेश पाटील, रमेश बोरनारे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री नितीन पवार,**

**संजय गायकवाड, संजय केळकर, बाबासाहेब पाटील, योगश कदम, ॲड. राहूल कुल, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री महेश शिंदे, राजेंद्र पाटणी, दिलीप बनकर, प्रकाश सुर्वे, सचिन कल्याण-शेट्टी, महेंद्र थोरवे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री संतोष बांगर, रणधीर सावरकर, दिलीप लांडे, किसन कथोरे, ॲड. आशिष जैस्वाल, सर्वश्री मिहीर कोटेचा, नरेंद्र भोंडेकर, जयकुमार गोरे, चंद्रकांत निंबा पाटील, नारायण कुचे, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रशांत ठाकूर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री हरिभाऊ बागडे, अभिमन्यू पवार, राजेश पवार, हरिष पिंपळे, राणाजगजितसिंह पाटील, सुरेश भोळे, संभाजी निलंगेकर-पाटील, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड. आकाश फुंडकर, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री किर्तीकुमार भांगडिया, गणपत गायकवाड, सर्वश्रीमती नमिता मुंदडा, मंदा म्हात्रे, सर्वश्री बबनराव लोणीकर, तान्हाजी मुटकुळे, नामदेव ससाणे, श्रीमती मोनिका राजळे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, राम सातपुते, संजय सावकारे, कॅ. आर. तमिल सेल्वन, डॉ. देवराव होळी, सर्वश्री कृष्णा गजबे, मोहन मते, तुषार राठोड, महेश लांडगे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री सुनिल कांबळे, भिमराव केराम, पराग शाह, दिलीप बोरसे, महेश चौघुले, श्रीमती आश्विनी जगताप, श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार, प्रा. डॉ. अशोक उइके, सर्वश्री सुभाष देशमुख, समिर कुणावार, मदन येरावार, टेकचंद सावरकर, राजेश पाडवी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री काशीराम पावरा, बबनराव पाचपुते, डॉ. संदीप धुर्वे, सर्वश्री मंगेश चव्हाण, धनंजय गाडगीळ, दादाराव केचे, कृष्णा खोपडे, विजय रहांगडाले, कालीदास कोळंबकर, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री संतोष दानवे, समाधान आवताडे, विजय देशमुख, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्याच्या दृष्टीने विद्यमान शासनाने सेफ्टीचे पर्सेप्शन तयार केले असणे, अनादी काळापासून प्रत्येक राज्य व्यवस्थेमध्ये गुन्हे घडत असले तरी देशातील अन्य राज्यांच्या दृष्टीने आपला महाराष्ट्र गुन्हेगारी रोखण्यात आघाडीवर असल्याचे निदर्शनास येणे, गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मागील वर्षभरात अनेक गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली असणे, २३९ लोकांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येणे, अंमली पदार्थांच्या संदर्भात सन २०२२ मध्ये हजारो गुन्हे दाखल असून मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, खंडणीबाबत घडणारे गुन्हे मोठ्या प्रमाणात कमी झालेले असणे, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अँन्टी नार्कोटीक सेल तयार करण्यात आला असणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात नार्कोटीक्सच्या संदर्भात शासनाने झिरो टॉलरन्स पॉलीसी सुरु केली असणे, विद्यमान शासनाने २० हजार पोलीस भरतीची एकत्रित प्रक्रिया राबवून सर्व रिक्त पदे भरण्यासाठी पद भरतीचे निर्बंध शिथील केले असणे, पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक यांना वर्षाकाठी देय असलेल्या नैमितिक रजा १२ ऐवजी २० करण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीसांना सवलतीच्या दरात गृह कर्जासाठी सन २०१७ ची लोकप्रिय योजना की जी मागील शासनाने बंद केली होती ती पुन्हा लागू केली असणे, राज्यात ३४ फॉरेन्सिक लॅब तयार करण्यात आल्या असून टेक्निकल एव्हिडन्स हा ह्युमन एव्हिडन्सपेक्षा

बोलका असल्याने व ह्युमन एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत असल्याने परंतु टेक्निकल एव्हिडन्स होस्टाईल होऊ शकत नसल्याने ही वस्तुस्थिती विचारात घेता फॉरेन्सिक लॅब अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य पोलीस व मुंबई पोलीस यांनी ऑपरेशन मुस्कानच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३८ हजार बालकांना त्यांच्या घरी सुखरूप पोहचविल्याचे निदर्शनास येणे, देशात हरवलेली बालके व पळून आलेली बालके शोधून त्यांच्या घरापर्यंत पोचविण्याच्या कामात मुंबई व महाराष्ट्र पोलीसांचा प्रथम क्रमांक असल्याचे निदर्शनास येणे, राजकीय व सामाजिक आंदोलनातील गुन्ह्यांमध्ये जून २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झालेले खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला असणे, पोलीस दलातील शिपाई, पोलीस शिपाई, चालक, सशस्त्र पोलीस संवर्गातील विविध कारणास्तव रिक्त झालेली पदे तात्काळ भरण्यास शासनाने मान्यता दिली असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सवाच्या कालावधीत ज्या गुन्ह्यांमध्ये ३१ मार्च, २०२० पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत व ज्या खटल्यांमध्ये अटी-शर्तींची पुर्तता होते असे खटले मागे घेण्याची कार्यवाही सुरू असणे, कोरोना प्रतिबंधक आदेश लागू झाल्यानंतर या आदेशाचे उल्लंघन झाल्यामुळे २१ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२२ पर्यंत दाखल खटले मागे घेण्याची कायदेशीर कार्यवाही सुरू असणे, पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी दिर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर उपाययोजना करण्याचा तसेच म्हाडाच्या मदतीने मुंबईतील पोलीस निवासस्थानांचा पुर्नविकास करण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, महिलांच्या समस्यांच्या संदर्भात वेगवेगळ्या जिल्ह्यात विशेष न्यायालये व जलद गती न्यायालये तयार करण्यात येणे, तसेच समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात येणे, बलात्काराच्या गुन्ह्यांबाबतीत ६० दिवसात चार्जशीट दाखल होण्याचे प्रमाण १८ टक्क्याहून वाढविण्यात पोलीस प्रशासनाला यश आल्याचे निदर्शनास येणे, राज्यात संवेदनशील असलेल्या नक्षलग्रस्त भागाकरिता शासनाने पुरेसा निधी उपलब्ध केलेला असणे, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने शासन प्राथमिकता देत असल्याने त्यानुषंगाने कन्व्हीक्शनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाचे प्रयत्न असणे, राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व मदत मिळण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री क्रमांक १८१ महिला हेल्पलाईन सुरू केली असणे, राज्यात स्टीट क्राईम डिटेक्शनमध्ये गुणात्मक बदल करण्याच्या दृष्टीने कमांड ॲण्ड कंट्रोल सिस्टीम प्रकर्षाने राबविण्याचा व आणखी ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असणे, राज्यात गणपती व दहिहंडी उत्सव मोकळ्या वातावरणात पार पडावे या दृष्टीने शासनाने त्यावरील निर्बंध उठविले असणे, पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी केली असणे, गणेशमुर्तीच्या उंचीवरील निर्बंध उठविले असणे, गणेशोत्सवाला कोणतेही शासकीय शुल्क भरावे लागू नये याची दक्षता घेतली असणे, ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ दांम्पत्यांना संरक्षण इत्यादी बाबतीत शासनाने कडक धोरण राबविल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यांत कपात झाली असणे, शासनाने मागील वर्षभरात न्यायव्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने प्रत्येक स्तरावर न्यायालयांची स्थापना करणे व न्यायालयांसाठी नवीन पदे निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले असणे, राज्यातील कारागृह क्षमतेपेक्षा कैद्यांची संख्या अधिक झाल्याने राज्यात वेगवेगळ्या जिल्ह्यात नवीन कारागृहे बांधण्याची कार्यवाही सुरु असणे,

अप्रकाशित प्रत

कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत कठोर उपाययोजना करण्याबाबत शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील महिला, बालके, उपेक्षित वंचित घटक व ज्येष्ठ नागरिक चिंतामुक्त व मोकळ्या वातावरणात राहत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने सर्वंकष विचारविनिमयातून नव-नवे उपक्रम राबविण्याची व त्यायोगे राज्य पोलीस दल अधिक सक्षम करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

**(शुक्रवार, दिनांक २८ जुलै, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**नऊ : सर्वश्री बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, अजय चौधरी, अशोकराव चव्हाण, अनिल देशमुख, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल प्रभू, नाना पटोले, राजेश टोपे, पृथ्वीराज चव्हाण, रोहित पवार, रविंद्र वायकर, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. अशोक पवार, सर्वश्री अतुल बेनके, बाळासाहेब पाटील, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री प्राजक्त तनपुरे, राजन साळवी, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, सुनिल राऊत, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, सुनिल केदार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, वैभव नाईक, संजय पोतनीस, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री रमेश कोरगावकर, अमिन पटेल, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नितीन देशमुख, सुरेश वरपुडकर, उदयसिंग राजपूत, रणजीत कांबळे, श्रीमती ऋतुजा लटके, श्री. संग्राम थोपटे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री कैलास गौरंट्याल, अमित झनक, कुणाल पाटील, शिरीष चौधरी, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुभाष धोटे, माधवराव जवळगावकर-पाटील, पी.एन. सडोलीकर-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री शिरीषकुमार नाईक, राजेश एकडे, बळवंत वानखडे, राजू पारवे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मोहनराव हंबर्डे, हिरामण खोसकर, झिशान सिध्दीकी, संजय जगताप, लहु कानडे, धीरज देशमुख, ऋतुराज पाटील, राजू आवळे, विक्रमसिंह सावंत, जितेश अंतापूरकर, श्रीमती जयश्री जाधव, श्री. रविंद्र धंगेकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, परिणामी कॉलेजमधील तरुण-तरुणी मोठ्या प्रमाणात ड्रग्जच्या आहारी जाणे, डान्सबार, पब, डिस्कोथेक, ऑनलाईन गेमिंग, ऑनलाईन लोन ॲपच्या माध्यमातून राज्यातील लोकांना, विशेषत: तरुण पिढीला लुटण्याचा व आयुष्यातून उठवण्याचा सुरु असलेला बेकायदेशीर व्यवसाय, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ व क्रुरतेने गाठलेला कळस, विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार करुन हत्या करण्याची मुंबईच्या मरीन ड्राईव्ह

येथील शासकीय वसतिगृहात अलिकडेच घडलेली घटना, एमपीएससी परीक्षेत राज्यात सहावी आलेली व वन परिक्षेत्र अधिकारी म्हणून निवड झालेल्या तरुणीचा काही दिवसांपूर्वी झालेला संशयास्पद मृत्यू, राज्यात एकूण १८ वर्षाखालील १४५३ मुली आणि १८ हजार १०० महिला अशा एकूण १९ हजार ५५३ मुली बेपत्ता असल्याचे गृहमंत्र्यांनी सादर केलेल्या निवेदनातून निदर्शनास येणे, महिला व मुलींवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये देशपातळीवर राज्याचा तिसरा क्रमांक असणे, बाललैंगिक गुन्ह्यात देश पातळीवर राज्याचा दुसरा क्रमांक असणे, महिलांवरील अत्याचारात २१६ टक्क्यांनी वाढ होणे, कामावर जाणाऱ्या महिलांवरील अत्याचारात १३९ टक्क्यांनी वाढ होणे, महिला अत्याचाराला आळा घालण्यासाठी आपल्या राज्याने तयार केलेला "शक्ती" कायदा केंद्र सरकारच्या स्तरावर अनेक महिन्यांपासून प्रलंबित असणे, हुंडाबळी रोखण्यात सरकारला आलेले अपयश, बारसू येथील रिफायनरी प्रकल्पविरोधी आंदोलन पोलिसी बळाने दडपण्याचा व आंदोलनकर्त्या महिलांवर लाठीचार्ज करण्याचा घडलेला निंदाजनक प्रकार, पोलिसांवर पडणारा ताण, पुणे, नागपूर, नाशिक यासारख्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया व अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरोधात करावयाच्या कारवाईत आलेली शिथिलता, मागासवर्गीय समाजावर होणारे हल्ले व त्यांच्यात वाढलेली असुरक्षिततेची भावना, जातीय/धार्मिक हिंसाचार व दंगलींचे वाढलेले प्रमाण, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर सुडबुध्दीने होणारी कारवाई, पोलीस संरक्षण देण्यात होत असलेला दुजाभाव, वारकऱ्यांवर पोलिसी लाठीचार्ज करुन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी प्रस्थान सोहळ्याला यावर्षी लागलेले गालबोट, राज्यातील लोकसंख्येच्या तुलनेत उपलब्ध पोलिसांचे अत्यल्प प्रमाण, महाराष्ट्रात सर्व कारागृहात क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक असलेले कैदी, यामुळे कारागृहात पसरलेली बेदिली, अंमली पदार्थांची सर्रास सुरु असलेली विक्री, खारघर येथे दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी आप्पासाहेब धर्माधिकारी महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा कार्यक्रमासाठी आलेल्या १४ श्री सदस्यांचा झालेला मृत्यू व या प्रकरणामध्ये चौकशी करण्याबद्दल होत असलेली टाळाटाळ, राज्यात अतिवृष्टी व गारपिटीने झालेल्या नुकसानीची मदत ३० ते ४० टक्के शेतकऱ्यांना न मिळणे, पीएपी धोरण निश्चित करण्याची होत असलेली मागणी, तसेच शासनाच्या बदली धोरणात आढळून येत असलेली अनियमितता, कापूस, सोयाबीन व इतर शेतमालाच्या हमी भावात वाढ करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, अति मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या विहिरींची दुरुस्ती मग्रारोहयोमधून करण्याबाबत दिनांक १ जुलै, २०२३ रोजीचा निर्णय पुन्हा लागू करुन त्यातून ही कामे करणे, तलाठी पदासाठी आलेल्या ११ लाख ५० हजार अर्जांच्या माध्यमातून प्रत्येकी ९०० रुपयेप्रमाणे रक्कम गोळा करुन होत असलेली बेरोजगारांची लूट, मुंबईसह राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील विविध समस्या, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील अनेक मोठ्या व महत्वाकांक्षी प्रकल्पांचे रखडलेले काम, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिका आणि एमएमआरडीएने नालेसफाईवर कोट्यवधी रुपये केलेले वारेमाप खर्च, या कामासाठी असलेल्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकल्यानंतरदेखील त्यांची पुन:स्थापना करणे, मुंबईत रस्ते कामांच्या सहा हजार कोटींच्या मेगा कॉंट्रॅक्टमध्ये अनियमितता झाल्याचे उघड होणे, स्ट्रीट फर्निचरमध्ये झालेला गैरव्यवहार, मुंबई

शहरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे नागरिकांना पुरेशा पाण्यापासून वंचित रहावे लागत असणे, इतर राज्यात निकृष्ट काम केलेल्या कंपनीला गोरेगाव-मुलुंड लिंक रोडचे काम दिल्याने कंत्राटदार निवड प्रक्रियेबाबत निर्माण झालेला संशय, मुंबईच्या पूर्व उपनगरातील गोवंडी, देवनार, मानखुर्द आणि चेंबूरमधील वायुप्रदुषणाने उच्चांक गाठला असणे, मुंबईतील कोस्टल रोड प्रकल्पातील बाधितांना नुकसानभरपाई देण्यात होत असलेली अक्षम्य टाळाटाळ, धारावी पुनर्विकास प्रकल्पात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यामुळे निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, मुंबईतील नगरसेवक निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर असलेली अनियमितता, गृहनिर्माण विषयी रखडलेले विविध प्रकल्प, म्हाडा इमारती, घरदुरुस्ती मंडळाला निधी न देणे, कारशेडसाठी जागा उपलब्ध होत नसल्याने मेट्रो ६ मार्गिकेचे काम रखडले असणे, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व अनियमिततेची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची रखडलेली कामे, राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रातील विविध नागरी प्रश्न, राज्यातील अन्य महानगरपालिकांमध्ये प्रशासक राजवटीत खर्चात झालेली भरमसाठ वाढ, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रातील स्मारकाच्या रखडलेल्या कामास गती देणे, राज्यातील अनेक विभागात उघड झालेले भ्रष्टाचार, प्रत्येक विभागात बदली, नियुक्ती यात होत असलेला गैरव्यवहार, मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेवरील पात्र असणाऱ्या आणि न्यायालयाच्या आदेशानुसार ज्यांनी शासनाकडे ७ हजार रुपये भरलेले आहेत अशा १२,८४९ झोपडपट्टीवासी तसेच २०११ च्या शासननिर्णयानुसार वास्तव्याचा अधिकार प्राप्त असलेल्या व सॅटेलाइट सर्व्हेनुसार वास्तव्याचा अधिकार पात्र असणाऱ्या एकुण २५ हजार घरांना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या बाजुला असणा-या जमिनी अधिगृहीत करुन त्याठिकाणी कायमस्वरुपी घरे बांधून देण्याबाबत होत असलेला विलंब. तथापि याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ ऑगस्ट, २०२३

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

असुधारित प्रत